E-ISSN: 3049-1541

KNOWLEDGE FLAME

INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# ‘निफाड तालुक्यातील कृषी विकासात कृषी केंद्रांचे योगदान: एक अभ्यास’

**मनोज किसन गायकवाड (संशोधक विद्यार्थी)**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, ता. जि. नाशिक.
मो. नं. ७०२०७१८६९१, ईमेल- gaikwadmanoj1989@gmail.com.
**प्रा. डॉ. संजय तुळशीराम शेलार (संशोधन मार्गदर्शक)**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नामपूर, ता. बागलाण, जि. नाशिक.
मो. नं. ९४२०३६१२२३, ईमेल-sanjayshelar99@gmail.com

---

**सारांश :**

निफाड तालुका हा कृषीप्रधान तालुका असल्यामुळे येथे कृषी केंद्रांना खूप महत्वाचे स्थान आहे. तालुक्यातील कृषी विकासामध्ये महत्वाचे योगदान या कृषी केंद्राचे आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये निफाड तालुक्यातील कृषी विकासात कृषी केंद्रांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधन अभ्यासाचा उद्देश निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांच्या इतिहासाचा अभ्यास करणे, कृषी केंद्रांनी शेतकरी वर्गासाठी राबविलेल्या कार्यक्रमांचा अभ्यास करणे व कृषी केंद्रांच्या परिणामांचा अभ्यास करणे हा आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा पद्धतीचा वापर करून तथ्य संकलनासाठी कृषी केंद्रातील कर्मचारी व शेतकरी वर्गाची मुलाखत, प्रत्यक्ष भेटी, सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन अभ्यासातून असे दिसून आले की, खूप निफाड तालुक्यातील कृषी केंद्रे शेतकऱ्यांना सतत आधुनिक कृषी तंत्रज्ञान, प्रशिक्षण, प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देत असतात. या केंद्रांमुळे शेतकरी वर्गामध्ये सुधारित बियाणे, आधुनिक सिंचन पद्धती आणि सेंद्रिय शेतीबद्दल जागरुकता वाढली आहे. तसेच तालुक्यातील शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढली आहे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली, रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. सेंद्रिय व नैसार्गिक शेतीचा प्रसार झाला. शेतकरी वर्गाचे आर्थिक व सामाजिक स्तर सुधारला. आधुनिक तंत्रज्ञानचा प्रसार व कृषी विकासाला चालना मिळाली.

**मुख्य शब्द :**

तालुक्यातील कृषी केंद्रे, कृषी केंद्रांनी राबविलेले कार्यक्रम, कृषी केंद्रांचा कृषी विकासावरील परिणाम, कृषी केंद्रांच्या समस्या व मर्यादा.

**प्रस्तावना :**

निफाड तालुका हा कृषिप्रधान तालुका आहे. प्राचीन कालखंडापासून येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तालुक्याची अर्थव्यवस्था मोठ्याप्रमाणावर शेतीवर आधारित आहे. निफाड तालुक्यात शेती ही आधुनिक

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

पद्धतीने केली जाते. तालुक्यात खूप मोठ्या प्रमाणावर बागायती शेती केली जाते. येथील गहू, कांदा, द्राक्ष, ऊस हे प्रमुख पिके आहेत. निफाड तालुक्यात ऊसाचे पिक सर्वाधिक घेतले जाते. तसेच द्राक्ष हे नगदी पिकाचे लागवडीखालील क्षेत्रही वाढलेले आहे. त्यामुळे तालुक्यात विंचूर या ठिकाणी वायनरी उद्योग विकसित झाला आहे. येथील द्राक्षांना परदेशात खूप मागणी आहे. तालुक्यातील हवामान पिकांसाठी पोषक असल्यामुळे पिक उत्पादन मोठ्याप्रमाणात होत असते. तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी व तिच्या उपनद्यांमुळे सुपीक काळी जमीन आहे. तालुक्यात लासलगाव व पिंपळगाव बसवंत अशा दोन प्रमुख कृषी बाजारपेठा आहे. ह्या बाजारपेठा तालुक्यातील कृषी विकासात महत्वाची भूमिका बजावत असतात. बाजारपेठांमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळू लागला आहे व कृषीमालास योग्य बाजारभाव मिळू लागला. त्यामुळे शेतमालाची विपणन व्यवस्था सुधारली. शेतकरी वर्गाची विविध मार्गाने होणारी आर्थिक फसवणूक व पिळवणूक थांबली. कृषीमालाचे वजनमाप योग्य पद्धतीने होवू लागले. तालुक्यात पशुधन जास्त असल्यामुळे कृषी व्यवसायाला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय व पशुपालन व्यवसाय मोठ्याप्रमाणात चालतो. कृषी व्यवसायासाठी योग्य जमीन, पोषक वातावरण, पाण्याची उपलब्धता व कष्टाळू शेतकरी यांमुळे कृषी व्यवसायाचा विकास होवून पिकलागवडीखालील क्षेत्र वाढलेले दिसून येते. तसेच तालुक्यात विविध कृषी योजना कृषी खात्यामार्फत राबविल्या जातात. त्याचाही चांगलाच परिणाम कृषी विकासावर झाला आहे. तालुक्यात सहकारी संस्थांचे जाळेच उभारलेले आहे. त्यांमुळे शेतीचा विकास होण्यास मदत झाली आहे. निफाड तालुका हा आधुनिक तंत्रज्ञान, ठिबक सिंचन व आधुनिक शेती पद्धतींचा वापर करणारा तालुका आहे. तालुक्यात दळणवळ साधनांचा विकास झाल्यामुळे शेतीच्या विकासाला चालना मिळाली आहे. तालुक्यातून ०८ जानेवारी १८६१ मध्ये रेल्वे वाहतूक सुरु झाली. रेल्वे लाईनमुळे कृषीमाल देशांतर्गत पाठवला जावू लागला.

अशा कृषिप्रधान निफाड तालुक्यात ०७ कृषी केंद्रे आहे. त्यांचा निफाड तालुक्यातील कृषी विकासात महत्त्वाचे योगदान आहे. या योगदानाचा सविस्तर आढावा प्रस्तुत संशोधनात घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांनी शेतकरी वर्गासाठी राबविलेल्या कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

३. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची मर्यादा :** प्रस्तुत शोधनिबंधात निफाड तालुक्यातील कृषी विकासात कृषी केंद्रांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा पद्धतीचा वापर करून तथ्य संकलनासाठी कृषी केंद्रातील कर्मचारी व शेतकरी वर्गाची मुलाखत, प्रत्यक्ष भेटी, सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## अ. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रे

'बदलत चाललेली शेतीची पद्धती व नवीन तंत्रज्ञान यांचे ज्ञान शेतकरी वर्गाला होण्यासाठी कृषी केंद्रे हे महत्वाची आहे. या केंद्रांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी पद्धतीचे धडे दिल्याने कृषी विकास झाला आहे.'[१]

**१. कृषी संशोधन केंद्र कुंदेवाडी (सन १९३२)**

'निफाड तालुक्यातील कुंदेवाडी हे २० ऑक्टोबर १९३२ मध्ये स्थापन झालेले पहिले कृषी संशोधन केंद्र आहे.'[२] या संशोधन केंद्रात सुरवातीला गहू, बाजरी, तीळ, करडई, वटाना, कापूस नंतर कांदा पिकाचे अधिक उत्पन्न देणारे वाण विकसित केले. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात या संशोधन केंद्रात केवळ गव्हाचे वाण विकसित करण्यात आले. 'या केंद्राने आत्तापर्यंत गहू पिकाच्या एकूण ३२ सुधारित जाती विकसित करून शेतकऱ्यांसाठी मोलाचे योगदान दिले आहे.'[३] या वाणांना नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाणांचे नावे देण्यात आली आहे. हे विकसित केलेले वाण शेतकरी वर्गाला केंद्राद्वारे माफक दरात वितरीत करण्यात येते. 'गव्हाचे विकसित केलेले वाण विविध परिस्थिती येणारे तसेच रोगप्रतिकारक क्षमता असणारे असल्यामुळे उत्पादन जास्त होते.'[४]

**२. तालुका बीजगुणन केंद्र पिंपरी भाग- ०१ (सन १९५९)**

'कृषिप्रधान निफाड तालुक्यात पिंपरी येथे तालुका बीजगुणन केंद्राची स्थापना ६ जानेवारी १९५९ मध्ये झाली. नंतर या तालुका बीजगुणन केंद्राचे बीजगुणन केंद्र पिंपरी भाग-०१, बीजगुणन केंद्र पिंपरी भाग-०२, बीजगुणन केंद्र पिंपरी भाग-०३ (१९६८) अशा भागात विभाजन करण्यात आले.'[५] या केंद्रांद्वारे विविध पिकांचे बीज उत्पादित करण्यात येत असे. उत्पादित केलेले बीज हे उत्कृष्ट दर्जाचे व अधिक उत्पादन देणारे असते. हे बीज शेतकऱ्यांना दिले जाते. त्यामुळे शेतकरी वर्गाचे शेतीचे उत्पादन वाढलेले दिसून येते.

**३. तालुका बीजगुणन केंद्र पिंपरी भाग- ०२**

तालुका बीजगुणन केंद्र भाग ०२ हे सन १९५९ नंतर सुरु करण्यात आले. या तालुका बीजगुणन केंद्राला स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. तसेच बीजगुणन केंद्राच्या भागात स्वतंत्र विहीर, गोडावून, शेतजमीन क्षेत्र आहे.

**४. बीजगुणन केंद्र पिंपरी भाग ०३ (सन १९६८)**

तालुका बीजगुणन केंद्र भाग हे सन १९६८ मध्ये सुरु करण्यात आले. या केंद्राला पण स्वतंत्र कर्मचारी वर्ग आहे. तसेच बीजगुणन केंद्रात स्वतंत्र विहीर, गोडावून, शेतजमीन क्षेत्र आहे. तालुका बीजगुणन केंद्र भाग-

**५. कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्र पिंपळगाव बसवंत (सन १९५९)**

'निफाड तालुक्यात कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्राची स्थापना सन १९५९ मध्ये करण्यात आली. हे कृषी संशोधन केंद्र महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत कार्यान्वित आहे. या कृषी संशोधन केंद्राने कांदा (१९५९ पासून ) व लसून पिकाच्या विविध जाती विकसित केल्या. आत्तापर्यंत कांदा पिकाच्या ०३ जाती व लसून पिकाच्या ०२ जाती विकसित केल्या आहे.'[६] तसेच या कृषी संशोधन केंद्राने द्राक्ष पिकाच्या लागवडीच्या संदर्भात संशोधन केले आहे. तसेच द्राक्ष पिकाच्या लागवडी संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन पण करत आहे. त्यामुळे कांदा व लसून

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

तसेच द्राक्ष पिकाचे उत्पादन वाढण्यास मदत झाली. 'या संशोधन केंद्राने विकसित केलेल्या कांद्याच्या वाणांना शेतकऱ्यांकडून दरवर्षी मोठी मागणी असते.'[७]

**६. नॅशनल होर्टीकल्चर रिसर्च डेव्हलपमेंट फाऊंडेशनन संस्था चितेगाव**

निफाड तालुक्यात चितेगाव येथे नॅशनल होर्टीकल्चर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशनन संस्था स्थापन झाली. 'ही संस्था कांदा, लसून व इतर भाजीपाल्याच्या जाती सुधारणे, माती परीक्षण, बियाणे तंत्रज्ञान व कीड नियंत्रणावर संशोधन करत असते. तसेच शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करत असते.'[८] या संस्थामुळे कांदा, लसून व भाजीपाला पिकांच्या पद्धतीत सुधारणा झाली आहे. तसेच शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्याची आर्थिक बचत होण्यास मदत झाली आहे.

**७. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणे, नाशिक विभाग, ओझर**

'महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणे, याची शाखा हे नाशिक विभागासाठी ओझर येथे सन १९८२ मध्ये स्थापन झाले. हे द्राक्ष बागायतदारांसाठी तांत्रिक मार्गदर्शन, चर्चासत्रे व पिक व्यवस्थान कसे करावे या बाबत माहिती पुरविणारी प्रमुख संस्था आहे.'[९] ही संस्था द्राक्ष बागायतदारांना तांत्रिक सहाय्य पुरवून उत्पादन वाढवण्यास मदत करते. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ ओझर या संस्थेने तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व संशोधनाशी जोडण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. या द्राक्ष भवन ओझरमुळे तालुक्यातील द्राक्ष शेतीचा विस्तार झालेला दिसून येतो आहे. हा संघ द्राक्ष बागायतदारांच्या समस्या सोडविण्यासाठी व द्राक्ष शेतीच्या शाश्वत विकासासाठी महत्वपूर्ण कार्य करत आहे.

## ब. तालुक्यातील कृषी केंद्रांनी शेतकरी वर्गासाठी राबविलेले कार्यक्रम

'ग्रामीण विकास हा कृषी विकासावर अवलंबून असतो. त्यामुळे ग्रामीण विकासात कृषी विकासाचे खूप महत्व आहे.'[१०] निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांनी कृषी विकासात खूप महत्वपूर्ण योगदान दिले आहे. कृषी केंद्रांनी खालीलप्रकारे शेतकरी वर्गासाठी कार्यक्रम आयोजित करून शेतकरी व शेतीच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत आहे.

**१. 'शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम**

या कृषी केंद्रांद्वारे आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, कीड, रोग व्यवस्थापन यावरती प्रशिक्षण आयोजित केले जाते, प्रशिक्षणासाठी तालुक्यातील व आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या प्रशिक्षणांमुळे शेतकरी वर्गाला नवनवीन शेतीच्या तंत्रज्ञानाची माहिती मिळते. त्यामुळे तालुक्यातील शेतीचा विकास होण्यास मदत झाली आहे..

**२. माती परीक्षण**

या कृषी केंद्रांच्या माती परीक्षण विभागामार्फत मातीची तपासणी करून योग्य खत व्यवस्थापनाचे मार्गदर्शन व सल्ला दिला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीत कोणत्या घटक मुलद्रव्याची कमतरता आहे हे

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

लक्षात येते. तसेच त्यानुसार शेतकरी वर्ग आपल्या शेतीत खतांची मात्र देत असतो. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत होते.

**३. महिला व युवक प्रशिक्षण**

तालुक्यातील कृषी केंद्रांमार्फत महिला शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. तसेच युवक प्रशिक्षण वर्गाचे पण आयोजन केले जाते. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन व इतर शेतीपूरक व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जात. यांमुळे तालुक्यातील शेतकरी महिलांचा विकास साधला गेला आहे. तसेच युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. तसेच शेतीच्या पूरक व्यवसायांचा विकास होण्यास मदत झाली.

**४. तांत्रिक मार्गदर्शन**

तालुक्यातील कृषी केंद्रे शेतकरी वर्गाला तांत्रिक मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे शेतकरी वर्गाला कृषी क्षेत्रात आलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होत असते. हे केंद्रे शेतकऱ्यांच्या समस्या सोडवत असतात. त्यामुळे पिक उत्पादन वाढण्यास मदत होते.

**५. प्रात्यक्षिक कार्यक्रम**

या कृषी केंद्रांद्वारे शेतीच्या आधुनिक पद्धती प्रत्यक्ष दाखवल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक पद्धती प्रत्यक्ष दाखविल्यामुळे चांगल्याप्रकारे समजतात. तसेच त्या पद्धतीबाबत असलेल्या अडचणी व शंका तेथेच सुटतात व अशा पद्धती आपल्या शेतात त्वरित राबवितात.

**६. कृषी सल्ला**

हे कृषी केंद्रे पिकांची कीड नियंत्रण, रोग नियंत्रण, खते इ. संदर्भात मार्गदर्शन करत असतात. योग्य तो सल्ला शेतकऱ्यांना देतात. यांमुळे शेतकरी वर्गाचा आर्थिक ताण कमी होवून आर्थिक बचत होते. तसेच शेतीचे उत्पादन वाढते.’[११]

## क. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांचा परिणाम

कृषी केंद्रांनी राबविलेल्या कार्यक्रमांमुळे कृषिप्रधान निफाड तालुक्यातील कृषी क्षेत्रात खालील सकारात्मक परिणाम दिसून येतात.

**१. ‘आधुनिक वाणांचा वापर वाढला**

तालुक्यातील कृषी केंद्राने विविध पिकांचे वाण विकसित केले. हे विकसित केलेले वाण शेतकऱ्यांना माफक दरात आपल्या विक्री केंद्राद्वारे दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार उत्पन्न मिळू लागले. याचा परिणाम असा झाला की, या आधुनिक व संकरीत वाणांचा वापर वाढला.

**२. सिंचनाची पद्धती सुधारली**

हे कृषी केंद्रे तालुक्यातील शेतकरी वर्गाला विविध पिकांच्या सिंचन पद्धती बाबत मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात व पिक उत्पादनात त्यांचा परिणाम दिसून येत आहे. शेतकरी वर्गाचे पिक लागवडीखालील क्षेत्र व पिक उत्पादन वाढलेले दिसून येते. पिंपळगाव बसवंत येथील कांदा व द्राक्ष कृषी

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

संशोधन केंद्राने द्राक्ष पिकांच्या सिंचन पद्धती बाबत शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन देत असते, त्यामुळे त्याचाही द्राक्ष शेतीवरती चांगला परिणाम दिसून येतो.

**३. द्राक्ष, कांदा व भाजीपाला या नगदी पिकांच्या उत्पादनात वाढ झाली.**

नगदी पिके हे ग्रामीण आर्थिक व्यवस्थेला पाठबळ देत असतात. हे पिके परकीय चलन मिळवून देत असता. नगदी पिकांपासून शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न मिळते. इतर उद्योगधंद्यांना कच्चा माल मिळतो. नगदी पिके मोठ्याप्रमाणात रोजगार मिळवून देतात. नगदी पिकांमुळे शेतीचा विकास होतो. अशा या द्राक्ष, कांदा व भाजीपाला या नगदी पिकांच्या संदर्भात ही तालुक्यातील कृषी केंद्रे संशोधन व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे या पिकांचे लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन वाढले.

**४. शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय व नैसर्गिक शेतीची जागरुकता वाढली .**

तालुक्यातील कृषी केंद्रे हे शेतकरी वर्गाला आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पद्धतीविषयी मार्गदर्शन करणारे महत्वाचे केंद्र आहे. या कृषी केंद्रांमुळे शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेतीची जागरुकता वाढली. शेतीला चालना मिळाली आहे. हे केंद्रे शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण देतात. रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर कमी करण्याचा सल्ला देत असतात व सेंद्रिय खते वापरण्यास प्रोत्साहन देत असतात. तालुक्यातील तालुका बीजगुणन केंद्रे पिंपरी येथे गांडूळ खत तयार करण्याचा प्रकल्प चालू आहे. येथे गांडूळ खत तयार करून शेतकरी वर्गाला दिले जाते. तसेच गांडूळ खत कसे तयार करावे याचे मार्गदर्शन येथील कर्मचारी वर्ग देत असतो.

**५. शेतकऱ्यांचे उत्पन्न व उत्पादन क्षमता वाढली.**

हे कृषी केंद्रे शेतकऱ्यांना नवीन शेती तंत्रज्ञान, संकरीत व सुधारती बियाणे यांविषयी मार्गदर्शन देत असतात. त्यामुळे पिक लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे. तसेच शेतीची उत्पादक क्षमता ही वाढली आहे. हे कृषी केंद्रे सुधारित बियाण्यांचा वापर, आधुनिक शेती तंत्रज्ञान, खते व किटकानाशकांचा योग्य वापर, माती परीक्षण व व्यवस्थापन, पिक संरक्षण व व्यवस्थापन यांचे प्रशिक्षण देतात. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न व उत्पादनक्षमता वाढलेली दिसून येते.

**६. गहू पिकाचे उत्पादन वाढले**

तालुक्यातील सन १९३२ मध्ये स्थापन झालेले कृषी विज्ञान केंद्र कुंदेवाडीने आजतागायत विविध परिस्थिती येणारे गहू पिकांचे वाण विकसित केले. हे संकरीत वाण विकसित करून त्यांनी शेतकरी वर्गाला विक्री केंद्राद्वारे अगदी माफक दरात दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचे गहू पिकाचे उत्पादन वाढले.

**७. रोजगाराची संधी**

तालुक्यातील या कृषी केंद्रांमुळे तालुक्यातील शेती मोठ्याप्रमाणात लागवडीखाली आली. तसेच शेतीचे उत्पादन वाढले. या सर्वांचा परिणाम म्हणजे लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. तसेच या कृषी केंद्रात पण तालुक्यातील लोक विविध विभागात काम करत आहे.'[१२]

KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

## ड. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांच्या समस्या व मर्यादा

**१. 'शेतकरी वर्गापर्यंत माहिती पोहचत नाही**

या कृषी केंद्रांचा तालुक्यातील शेतकऱ्यांना खूप फायदा झाला आहे. त्यांच्या शेतीचा विकास होवून आर्थिक परीस्थितीत सुधारणा झाली आहे. परंतु सर्वक्षणाद्वारे असे दिसून येते की, तालुक्यातील काही शेतकऱ्यांना या संशोधन केंद्रांविषयी माहिती नाही. त्यामुळे त्यांच्या पर्यंत ती माहिती पोहोचली जात नाही.

**२. काही शेतकरी शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास संकोच करतात**

निफाड तालुका कृषीप्रधान तालुका असल्यामुळे तालुक्यातील शेती ही आधुनिक पद्धतीने केली जाते. परंतु तालुक्यातील काही शेतकरी अजूनही पारंपारिक पद्धतीने शेती करण्यास प्राधान्य देत असतात. त्यामुळे ते कृषी विज्ञान केंद्रांनी सांगितलेले शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास संकोच करतात.

**३. आर्थिक अडचणींमुळे शेतीच्या आधुनिक साधनाच्या वापरावर मर्यादा येतात**

शेती व्यवसायात आर्थिक भांडवल महत्वाचे असते. आर्थिक भांडवलाशिवाय शेतीचा विकास अपूर्ण आहे. या केंद्रांनी सुचविलेल्या शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींमुळे मर्यादा येत असतात.'[१३]

**निष्कर्ष :**

निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांनी तालुक्यातील कृषी विकासात मोलाचे योगदान दिलेले आहे. शेतकरी प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, प्रात्याक्षिके इत्यादींमुळे शेतीचे लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. एकदंरीत निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांमुळे तालुक्यातील शेतीचा विकास होण्यास मदत झाली आहे.

**संदर्भग्रंथ**

१. मुलाणी एम. यु. व लोहकरे रोहिदास, महाराष्ट्रातील शेती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, ऑक्टोबर २०००, पृ. ८२.
२. https://mpkv.ac.in/Research/ReserchPlianZone.
३. गहू संशोधन केंद्रांच्या बळकटीकरणावर भर, अग्रोवन, २८ जाने. २०२६.
४. निलेश मगर, प्राध्यापक, कृषी संशोधन केंद्र, कुंदेवाडी, ता. निफाड, जि. नाशिक, माहितीचे संकलन.
५. तालुका बीजगुणन केंद्र पिंपरी, ता. निफाड, जि. नाशिक, कार्यालयीन कागदपत्रांद्वारे माहिती संकलित.
६. कांदा व द्राक्ष कृषी संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक, अहवाल २०२५.
७. कांद्याच्या वाणाची विक्री, लोकमत १८ मे २०२४.
८. www.nhrdf.com/
९. https://mrdbs.org.in/
१०. पाटील, बी.के, ग्रामीण विकास, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१७, पृ. १४.
११. निफाड तालुक्यातील कृषी केंद्रांना प्रत्यक्ष भेट.
१२. निफाड तालुका सर्वेक्षण.
१३. निफाड तालुक्यातील शेतकरी वर्गाच्या मुलाखतीद्वारे माहितीचे संकलन .